# जनसंपर्क अधिकारी

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय

रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे- ४०११०७

Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


**प्रेस नोट ४२४-२०२४** **दिनांक- १२/११/२०२४**

## " सायकल चोरी करणा-या सराईत आरोपीताला अटक करुन त्याच्याकडुन ९५,०००-/ रुपये .किंमतीच्या एकुण २० चोरीच्या सायकली हस्तगत करण्यात काशीगांव पोलीस स्टेशनच्या गुन्हे प्रकटीकरण पथकाला यश."

--------//---------

दिनांक १०.११.२०२४ रोजी फिर्यादी नांमे श्रीमती काजल भारत वानखेडे २६ वर्षे, व्य- घरकाम रा. काशिगाव मिरारोड पु.ता.जि.ठाणे यांनी काशिगांव पोलीस स्टेशन येथे तक्रार दिली कि, दिनांक ०८.११.२०२४ रोजी दुपारी ०२.०० वा ते दिनांक ०९/११/२०२४ रोजीचे सकाळी ०९.०० वा.चे दरम्यान ०८.३० वा चे दरम्यान रुम.नं. ०१ गगनगिरी चाळ ,मिनाक्षी नगर , काशिगाव ,मिरारोड पुर्व.ता.जि.ठाणे. येथे रुमचे बाहेर उभी करुन ठेवलेली हिरो कंपनीची सायकल कोणीतरी अज्ञात इसमाने तक्रारदार त्याचे संमती शिवाय स्वत:चे फायद्याकरिता चोरुन नेले म्हणुन त्यांनी काशिगांव पोलीस स्टेशन येथे अनोळखी इसमा विरुध्द काशिगांव पोलीस स्टेशन गु.र.नं ३८५/२०२४ भारतीय न्याय संहीता कलम ३०३(२) प्रमाणे गुन्हा नोंद केला आहे.

काशिगांव पोलीस स्टेशनच्या हद्दीत तसेच परिमंडळ ०१ मिरारोड ,मिरा-भाईदर हद्दीत सायकल चोरीच्या तक्रारी वाढल्याने वरिष्ठांनी आरोपीताचा शोध घेवुन नमुद गुन्हे उघड करण्याच्या सुचना दिल्या होत्या त्या प्रमाणे गुन्हे प्रकटीकरण शाखेचे अधिकारी व अंमलदार यांनी कौशल्यपुर्ण तपास करुन आरोपींची माहीती प्राप्त करुन नमुद गुन्ह्यात आरोपी नामे मिर्झानुर रेहमान मंडल वय ३१ वर्षे, व्य- बिगारी रा. हैदरी चौक ,नयानगर, मिरारोड (पु.) ता. जी. ठाणे मुळ रा. गाव- बेकी, पो.ठाणा- मटीया ता. भौसीरहाट, जि. उत्तरचब्बीस परगणा राज्य. पश्चिम बंगाल यांस अटक केली आहे. नमुद गुन्ह्यातील फिर्यादी यांचे चोरी केलेली सायकल तसेच आरोपीताने इतर वेगवेगळ्या ठिकाणी चोरी केलेल्या हिरो ,लिडर ब्रिझ, एस.टी.१०० रॉक रायडर एम.टी.व्ही अल्टीस ,एम.टी.बी अशा विविध कंपनीच्या सायकली अश्या एकुण २० सायकली त्याची अंदाजे किंमत ९५,०००/ रु.किं.चा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.

अटक आरोपी मिर्झानुर मंडल हा सायकल चोरीचे गुन्हे करण्यात सराईत असुन त्याच्या विरुद्ध दाखल असलेल्या गुन्ह्याचा अभिलेख पाहिला असता त्याच्या विरुद्ध यापुर्वी ०१ गुन्हे दाखल आहे.

वरिल नमुद गुन्ह्यातील अटक आरोपीताकडे पुढील तपास वरिष्ठ पोलिस निरीक्षक महेश तोगरवाड यांच्या

प्रताप पाचुंदे हे करत आहे.

सदरची कामगिरी श्री.प्रकाश गायकवाड, पोलीस उप आयुक्त परिमंडळ ०१, डॉ विजय मराठे,सहाय्यक पोलीस आयुक्त, मिरारोड विभाग महेश तोगरवाड,वरिष्ठ पोलीस निरीक्षक,काशिगांव पोलीस स्टेशन यांच्या मार्गदर्शनाखाली काशिगांव पोलीस स्टेशनचे गुन्हे प्रकटीकरण शाखेचे अधिकारी/अंमलदार यांनी केली आहे.





--------------00000-------------